ORDER
Seem.

*Abhay M.Vibhute*

वडगाव मावळ येथील मे. प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांचे न्यायालयात

एस. एस. सी. १९००/२०२५

विश्वास सदाशिव लोखंडे — फिर्यादी

विरुद्ध

मिलिंद शंकर वाघमारे — आरोपी

फिर्यादी यांनी कलम १४३ (अ) अंतर्गत

अंतरिम भरपाई मागण्यासाठी केलेल्या

अर्जास आरोपी तर्फे म्हणणे खालीलप्रमाणे,

१. आरोपी यांना पैश्याची अडचण भासल्याने व आरोपी यांनी फिर्यादी यांचे कडे हात उसने पैशाची मागणी केली असता फिर्यादी यांनी आरोपी यांनी रक्कम रुपये २,००,०००/- ही रक्कम ७% व्याजदराने अन्य ठिकाणावरून घेऊन देतो असे भासवून त्यांच्या स्वत:च्या जवळील रक्कम आरोपींना देवू केली व त्या रकमेच्या बदल्यात आरोपी कडून फिर्यादी यांनी आरोपीची सही केलेला रक्कम नमूद न केलेला कोरा चेक सिक्युरिटी म्हणून स्वत:कडे ठेऊन घेतला होता.

२. आरोपी यांना खरोखरीच पैशाची आवश्यकता असल्याने व आरोपी हे सर्व पैसे वेळेत परत करण्यास तयार असल्याने आरोपीने फिर्यादी यांना कोरा चेक लिहून दिला होता व आहे.

३. आरोपीने फिर्यादी यांचेकडून घेतलेली रक्कम फिर्यादी यांच्या नावे अनेक वेळा रोखीच्या स्वरूपात व बँक मार्फत फिर्यादी यांच्या खात्यावर जमा केली होती व आहे ती खालीलप्रमाणे

आरोपी यांनी फिर्यादी यांना रोखीने दिलेली रक्कम खालीलप्रमाणे

१) दि. ३/१०/२०२२ रोजी रोख रक्कम १२०००/-

२) दि. २०/२/२०२३ रोजी रोख रक्कम ७८५०/-

३) दि. २१/५/२०२३ रोजी रोख रक्कम १००००/-

एकूण मिळून २९८५०/-

आरोपी यांचे बँक खाते वरून फिर्यादी यांना देलेली रक्कम

१) दि. ११/९/२०२० रोजी १४०००/-

२) दि. १०/१०/२०२० रोजी १५०००/-

३) दि. ३/१/२०२१ रोजी ५०००/-

४) दि. ५/१/२०२१ रोजी ५०००/-

५) दि. १७/१/२०२१ रोजी ७५००/-

६) दि. २५/२/२०२१ रोजी १५०००/-

७) दि. १५/३/२०२१ रोजी २५००/-

८) दि. २२/३/२०२१ रोजी १०,०००/-

९) दि. १९/७/२०२१ रोजी १३००/-

१०) दि. २५/७/२०२१ रोजी १७००/-

११) दि. १४/०४/२०२२ रोजी १२६५०/-

१२) दि. ५/६/२०२२ रोजी २०००/-

१३) दि. २/१०/२०२२ रोजी ३०००/-

१४) दि. ४/१०/२०२२ रोजी ४५००/-

१५) दि. १८/४/२०२३ रोजी १०००/-

१६) दि. १०/५/२०२३ रोजी ५००/-

१७) दि. १३/३/२०२४ रोजी ८०००/-

एकूण रक्कम रुपये १,३८,५००/-

आरोपी यांचे भाऊ यांचे बँक खाते वरून फिर्यादी यांना दिलेली रक्कम

१) दि............ रोजी ५०००/-

२) दि. ८/१२/२०२० रोजी ४५००/-

३) दि. २४/५/२०२१ रोजी ५०००/-

एकूण मिळून १४,५००/-

येणेप्रमाणे वरीलप्रमाणे एकूण रक्कम रुपये १,८२,८५०/- म्हणजेच ९०% रक्कम आज पर्यंत आरोपीने फिर्यादी यांना देवू केली आहे त्यामुळे फिर्यादी यांची २,००,००० /- रुपयांसाठी केलेली केस ही प्रथम दर्शनी खोटी साबित होत असून आरोपी ला नाहक त्रास देण्याकरिता व मे. न्यायालयाचा वेळ वाया घालविण्याच्या उद्देशाने फिर्यादीने केलेला सदरचा अर्ज नामंजूर करण्यात यावा. व आरोपी यांचे लाभात योग्य ते न्यायनिर्णय करण्यात यावेत.

येणेप्रमाणे म्हणणे दाखल केले असे.

वडगाव

दि. २८/८/२०२५

Mtilekar

आरोपी तर्फे वकील

(Adv. Mrunal Tilekar